## दाव्यातील नि.क्र. २७ वरील आदेश

## (पारित दिनांक १२ ऑक्टोबर,२०२२)

प्रस्तुतचा अर्ज वादीतर्फे दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ नुसार दाव्यात दुरुस्ती करणेस परवानगी मिळणेकरिता दाखल केलेला आहे.

०२. अर्जदारांचे कथन असे आहे की, सदरचा दावा हा वाटप व निरंतर मनाई मिळण्यासाठी दाखल केला आहे. अर्जदार यांच्या म्हणण्याप्रमाणे दावा मिळकत १-क पैंकी काही क्षेत्र प्रतिवादी क्र. १ ने निलेश श्यामराव जगताप यांना रजिस्टर खरेदीदस्त क्र. ४३०६/२०२१ प्रमाणे विक्री केलेले आहे. त्यामुळे निलेश श्यामराव जगताप यांना प्रस्तुत दाव्यात सामील करण्याकरीता व त्याअनुषंगाने दाव्यामध्ये दुरुस्ती करण्याकरीता वादी यांनी प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे.

०३. प्रतिवादी यांनी प्रस्तुत अर्जावर म्हणणे देवुन अर्ज कायदेशीर नसल्याने नामंजुर करावा अशी विनंती केलेली आहे.

०४. संपुर्ण अभिलेखाचे अवलोकन केले. अर्जदाराचे विद्वान विधीज्ञांचा युक्तिवाद ऐकला. अर्जदाराचे कथन व पटलावरील कागदपत्रे पाहता वाद मुद्दे निश्चित करुन त्यावर मी माझे निष्कर्ष कारणमिमांसेसह खालीलप्रमाणे नोंदवित आहेः

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १) | वादींनी अर्जामध्ये सुचविलेली दुरुस्ती करुन मिळणेस पात्र आहेत काय? | ... होकारार्थी |
| २) | आदेश काय? | अर्ज मंजुर करणेत येत आहे. |

## कारणमिमांसा

**वाद मुद्दा क्रमांक १ करिताः**

०५. अर्जदार यांनी प्रस्तुतचा दावा वाटप व निरंतर मनाई मिळण्याकरीता दाखल केला आहे. अर्जदारांचे असे कथन आहे की, दावा मिळकत १-क गट नं. ३०६ क्षेत्र ४३.९५ आर इतके क्षेत्र प्रतिवादी क्र. १ ने दि.०७/०७/२०२१ रोजी निलेश श्यामराव जगताप यांना रजिस्टर खरेदीदस्त क्र. ४३०६/२०२१ प्रमाणे विक्री केलेला आहे. सदर खरेदीपत्राप्रमाणे फेरफार क्र. १३९२६ मंजुर होवुन निलेश श्यामराव जगताप यांचे नाव दावा मिळकतीचे ७/१२ पत्रकी नमुद झालेले आहे. त्यामुळे त्यांना दाव्यातील सरनाम्यात प्रतिवादी क्र. ३ म्हणुन सामील करण्याकरीता

व त्याअनुषंगाने मुळ दाव्यामध्ये दुरुस्ती करण्याकरीता प्रस्तुचा अर्ज दाखल केलेला आहे. त्यामुळे तो मंजुर करण्यात यावा अशी विनंती वादी यांचे विद्वान विधीज्ञांनी केलेली आहे. प्रतिवादी यांचे विद्वान विधीज्ञांनी सदरच्या अर्जास आक्षेप नोंदविला. परंतु, युक्तिवादादरम्यान प्रस्तुतचा अर्ज खर्चासह मंजुर करण्याबाबत विनंती केली.

०६. अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन केले असता वादी यांनी त्यांचे दिलेल्या अर्जामधील कथनांचा विचार करता दावा मिळकत प्रतिवादी क्र. १ ने प्रस्तुतचा दावा प्रलंबित असतांना निलेश जगताप यांना विक्री केलेली आहे. त्यामुळे वादींना प्रस्तुत दाव्यामध्ये त्याअनुषंगाने दुरुस्ती करण्याची आहे. कायदयातील प्रचलित तरतुदीनुसार दाव्यामध्ये कोणत्याही टप्प्यावर पक्षकारांच्या दरम्यान असलेले वाद अंतिमतः निकाली काढण्याकरीता दुरुस्ती करता येवु शकते. अर्जदारांनी सुचविलेली दुरुस्ती कायद्यांर्तगत असुन सदर दुरुस्तीमुळे प्रतिवादींच्या कथनास कोणतेही हानी पोहोचत नाही. याउलट दाव्याचे अंतिम निकाल गुणदोषावर होण्यास मदतच होणार आहे. परंतु, प्रतिवादी क्र. १ ने दावा मिळकत १-क ही सन २०२१ मध्ये विक्री केलेली आहे व प्रस्तुतचा अर्ज वादींनी दि.०६/०८/२०२२ रोजी दाखल केलेला आहे. यावरुन वादी यांनी सदर दावा मिळकतीबद्दल तसेच दाव्यात नमुद वर्णनाबद्दल योग्य ती माहिती लवकरात लवकर अभिलेखावर दाखल करणे गरजेचे होते. परंतु तसे न केल्याने वादी यांचा प्रस्तुतचा अर्ज खर्चासह मंजुर होण्यास पात्र असुन परिणामतः वाद मुद्दा क्र. १ चे उत्तर होकारार्थी नोंदवुन मी, खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहेः

## <u>आदेश</u>

१. नि. २७ वरील अर्ज खर्चासह मंजुर करणेत येत असुन प्रस्तुत अर्जाचा खर्च रक्कम रुपये ५००/- वादी यांनी प्रतिवादींना एकत्रीतरित्या दयावा.

२. अर्जदार यांनी अर्जातील सुचविलेली दुरुस्ती दाव्यामध्ये आजपासुन १४ दिवसांचे आत किंवा पुढील नेमलेल्या तारखेपुर्वी करावी, तसेच दुरुस्त दाव्याची प्रत दुरुस्ती केलेच्या दिवशी दाखल करावी.

३. दोन्ही बाजुंनी आदेशाची दखल घ्यावी.

**<u>सही/-</u>**
**(जी.ए.कुलकर्णी)**
४ थे सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, दौंड,
ता. दौंड, जि. पुणे.

ठिकाणः दौंड,
दिनांक १२/१०/२०२२.

# CERTIFICATE

I affirm that the contents of this P. D. F. file Judgment are same, word to word, as per the original Judgment.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | : | A.S. Mundhe |
| Court | : | G.A. Kulkarni |
| | | 4th Jt.C.J.J.D., Daund, Dist. Pune. |
| Date | : | 12.10.2022 |
| Judgment signed by the presiding officer on | : | 12.10.2022 |
| Judgment uploaded on | : | 12.10.2022 |